महाराष्ट्र नागरी सेवा [रजा] नियम १९८१ या नियम ५०[२] - एका वेळी उपभोगण्याच्या अर्जित रजेच्या मर्यादेमध्ये वाढ.

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
शासन निर्णय क्रमांक: अरजा २४९१/५५/सेवा-९,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक २० सप्टेंबर १९९१.

## शासन निर्णय

महाराष्ट्र नागरी सेवा [रजा] नियम, १९८१ च्या नियम ५०[२] मधील तरतुदीनुसार राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना एकावेळी फक्त १२० दिवस अर्जित रजा घेता येते. सदर मर्यादा १८० दिवस इतकी वाढविण्याबाबतचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. शासन आता असा आदेश देत आहे की, नियम ५०[२] अन्वये, एकावेळी अर्जित रजा उपभोगण्यासाठी असलेली सध्याची १२० दिवस ही मर्यादा १८० दिवस इतकी वाढविण्यात यावी. वरील आदेशाचा परिणाम म्हणून नियम ५०[३] मध्ये उल्लेखिलेली १२० दिवस ही मर्यादासुध्दा १८० दिवस इतकी वाढविण्यात यावी.

२. वरील आदेश दिनांक २ सप्टेंबर १९९१ पासून अंमलात येतील.

३. महाराष्ट्र नागरी सेवा [रजा] नियम १९८१ च्या नियम ५०[२] व [३] मधील तरतुदीमध्ये वरील तरतुदीपुरती सुधारणा करण्यात आली आहे असे मानण्यात यावे. वरील नियमांना यथावकाश रितसर सुधारणा करण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

अ. ना. कुलकर्णी,
शासनाचे उपसचिव.

प्रति,

महालेखापाल-१ [लेखा व अनुज्ञेयता], महाराष्ट्र, मुंबई,
महालेखापाल-२ [लेखा व अनुज्ञेयता], महाराष्ट्र, नागपूर,
महालेखापाल-१ [लेखा परीक्षा], महाराष्ट्र, मुंबई,
महालेखापाल-२ [लेखा परीक्षा], महाराष्ट्र, नागपूर,
संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई,

शा. म. मु. रोटा/वि. वि. /एच-५७५[१२०००+१२-९-९१] [कृ. मा. प.]